OFFICE OF THE DIRECTOR OF CIVIL SUPPLIES (ACCOUNTS),
42, NEW MARINE LINES, BOMBAY 1.

No. [illegible]76/ 7516 Dated 5th August, 1959.

To

All Collectors (excepting the Collector of Greater Bombay).

COLLECTOR'S OFFICE Date 8/8 Branch RATNAGIRI

Subject:- Maintenance of accounts of the Fair Price Shops Scheme in the Districts-- Regarding Octroi charges and damaged grains.

-----

It is observed that no uniform procedure is being followed in respect of recording of claims and recoveries for the payment of octroi charges. It is also noticed that there is no uniformity in accounting of the damaged grains received at the time of import. The following instructions are, therefore, issued.

(A) Octroi Charges:

(i) Attention is invited to Government letter No.NGD-2557/146998-W dated 19-9-1957 addressed to the Collector of Madhya Saurashtra and copy endorsed to all other Collectors in which it had been indicated that the local bodies are not legally entitled to levy octroi on foodgrains imported into the octroi limits on Government account. Collectors were, however, authorised to pay octroi duty provisionally, pending final decision of Government and it was indicated that the provisional payments may have later to be recovered from the Municipalities, if the final decision of Government were that the duty was not payable.

In order to facilitate recovery of all such provisional payments, all the Collectors are requested to record, in future, these provisional payments in a separate section 'Provisional Payments on account of octroi duty to be recovered' in register 'G' prescribed in the Manual of Food Accounts. Clear details of Railway Receipts etc., kind and variety of grain, quantities imported, voucher No. and date under which provisional payment was made, etc. should be indicated in Col.6 of Register 'G' to facilitate linking with the initial payment.

(ii) According to the instructions given in para 25(3) of the Manual of Food Accounts, provisional payments of octroi charges must have been recorded in the 'G' register under section '(iii) Private Parties'. If this has not been done so far, in any district, all provisional payments of octroi charges made so far, under the Fair Price Shops Scheme, should now be recorded in the new section as suggested in the preceding sub-para (i). All such payments made before the introduction of the Manual of Food Accounts should also be listed in the Section of Register 'G' to be opened as instructed in sub-para (i) above.

(iii) Attention of the Collectors is also invited to the concluding portion of para 5 of the Government letter No.OCF/3632/P dated 19-6-58, wherein instructions have been* regarding claiming of refunds of octroi charges on re-exports. Until the question of claiming exemptions is decided by Government and refunds of the initial payments of octroi charges, are actually claimed on that basis, the usual procedure of preferring claims, wherever admissible under the rules, for refund of octroi on re-exported stocks will have to be continued. Such claims for refunds should also be recorded in the 'G' register in another section. In this case, the Section should be entitled "Refunds of octroi duty claimable on account of exports". The particulars and quantities exported by linking them as far as possible with previous payment of octroi, should be given in the Col.6 of the Register 'G'. It should be noted that when the entire original payments of octroi are recovered, the claims for refunds on exports forming a part thereof will have to be dropped; till then they should continue to be pursued. Recoveries made of refunds due on exports should also be noted in the remarks column of Form 'G' in Section, "Provisional payments on account of octroi duty to be recovered" so that the net balance of octroi duty can be easily ascertained for recovery on the final decision of Government.

*given

(B) Damaged Grains:

Necessary provision for showing in Form 'B' the quantity of grain received in damaged condition is being made in the revised form, which will be supplied by the Press to Districts.

(ii) The damage, however, is rarely a total damage i.e. either a part which cannot be isolated at the Railway Station is totally damaged or the grain is still saleable but has suffered in quality. The extent of damage only has therefore, to be noted in Form 'B' on visual inspection, but no quantity can be deducted as shortage on this account. Consequently, the damaged bags have first to be accounted as receipt at the godown and the receipt recorded in Forms E(1) and E. For the purposes of godown accounts, therefore, the quantity received in damaged condition should not be shown as a loss in transit, but it should be initially accounted for as receipt of good grain and shown in Col.(12) of Form E(1) with suitable remarks about the nature and extent of damage in Col.(17) in that register.

(iii) The net quantity accounted for in Col.(12) of Form E(1) has also to be recorded in Form E- Stack Register. For obvious reasons, the damaged quantity cannot be stacked with good grain, although for the purposes of accounts the entries of damaged grains are made in the Stack Register. The Collectors should, therefore, direct the godown staff to keep the damaged grains separately. It should be treated as part of the stack in which the main portion of the consignment is kept. The necessary particulars for identification such as Railway Receipt No. and Date, Transport Pass No. and date, date of receipt in the godown, etc. should be available in the Stack Register. It should then be ensured that immediate action is taken to salvage or clean the bags and the good grain is stacked in the appropriate stack. If after cleaning or salvaging it is found that a part or whole of the quantity is damaged, it should be transferred to Register Z(2). In that case the damaged part will constitute godown or cleaning loss, as the case may be, and shown under Cols. (15) or (16) in Register 'E' with suitable remarks in Col.(22) of that Register about the transfer of the damaged quantity to Register Z(2). The separate portion of the stack containing the damaged grain will now be treated as covered by Register Z(2). It should, however, be noted that a claim has to be preferred against the Railway or the Country Craft transporter or the truck or cart owner for the damaged grain as per assessment made on the receipt of the grain which will appear in Form 'B'.

(iv) The value of claims made for damaged grain should be accounted at the end of the quarter as follows:-

| | | |
|---|---|---|
| "Railway claims" or "Creditors for purchases" | Dr. | |
| "Profit and Loss account" (recovery on damaged grains) | | Cr. |

The stock account will not be affected at this stage as the corresponding shortage will be accounted as godown or cleaning loss as stated in sub-para (iii) above and the entry will not appear in the Working Sheets (1) or (2).

(v) Suitable additions and corrections to the instructions contained in para 25(14) and other relevant paras of the Manual of Food Accounts will be issued in due course.

2. The receipt of this circular should please be acknowledged.

Instructed

Copy forwarded for information to:

1. All the Divisional Commissioners (with one spare copy each for the Divisional Accounts Supervisors).
2. The Accountant General, Bombay.
3. The Senior Deputy Accountant General, Rajkot.
4. The Senior Deputy Accountant General, Nagpur.
5. The Assistant Accounts Officer, Outside Audit Department, Office of the Accountant General, Bombay with reference to his letter No.OA/FPS/754 dated 13-2-59 and subsequent reminder No.OA/FPS/74 dated 20-4-59.(with 25 Copies)
6. The Agriculture & Forests Department, Old Secretariat Building, Bombay.
7. The Inspectors of Accounts for the Fair Price Shops Scheme,
8. The Divisional Inspectors of Supply Accounts,
9. The F.P.S./P.F.Section.
10. The F.P.S./D.S.Section.
11. For the File No.FPS/74 regarding corrections to the Manual of Food Accounts.

5/8/59
(A.K.Jeurkar.)
Assistant Director of Civil Supplies (Accounts).

0/4/8.

SA

most urgent

No. SAB.WT.I.
8-10-59

-२१ — ३२

राज्य शासकीय क. ...
योजना, १९८२ सुरू करण.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्र. डीओआय. २०८१/४७०१/एडीएम्-५
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ एप्रिल १९८२

## शासन निर्णय

राज्य शासकीय कर्मचारी सेवेत असताना मृत्यू पावल्यास त्याच्या कुटुंबाला काही मदत व्हावी आणि राजीनामा, मृत्यू, सेवानिवृत्ती इ. कारणांमुळे कर्मचाऱ्याची सेवा संपुष्टात आल्यास त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला काही ठोक रक्कम मिळावी अशा दुहेरी लाभासाठी विम्याचे संरक्षण देण्याची तरतूद करण्याच्या दृष्टीने, राज्य शासन कमी खर्चाची व सर्वस्वी वर्गणीच्या स्वरूपाची आणि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी अशी राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना १ मे १९८२ पासून सुरू करीत आहे. प्रस्तुत योजनेचा तपशील सोबतच्या जोडपत्रात दिलेला आहे. ही योजना सक्तीची राहील.

२. शासन आणखी असाही निदेश देत आहे की, संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे ही योजना राबवतील आणि लेखांकन कार्यपद्धतीनुसार तिचे हिशेब ठेवतील. ही लेखांकन पद्धती स्वतंत्रपणे विहित करण्यात येत आहे. संचालक, लेखा व कोषागारे यांनी वित्त विभागास नियतकालिक अहवाल सादर करावे.

३. सर्व विभाग प्रमुखांनी व कार्यालय प्रमुखांनी या राज्य शासकीय कर्मचारी गटविमा योजनेचा तपशील, आपापल्या हाताखालील कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावा आणि ही योजना १ मे १९८२ पासून अंमलात आणली जाईल याची खात्री करून घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनिल कुमार,**
शासनाचे सचिव, वित्त विभाग.

प्रति—
सर्व विभागीय आयुक्त ;
राज्यपालांचे सचिव ;
मुख्य मंत्र्यांचे सचिव ;
महालेखापाल, महाराष्ट्र-एक, मुंबई ;
महालेखापाल, महाराष्ट्र-दोन, नागपूर ;

## जोडपत्र

## राज्य शासकीय कर्मचारी गटविमा योजना, १९८२

**अंमलबजावणीची तारीख**

अमरावती; १. जिचा यापुढे "योजना" असा उल्लेख करण्यात आला आहे ती राज्य शासकीय कर्मचारी गटविमा योजना, १९८२ (१ मे १९८२ मध्यान्हपूर्वपासून) अंमलात येईल.

**उद्दिष्ट**

२. कर्मचारी सेवेत असताना त्याला मृत्यू आल्यास त्याच्या कुटुंबाला मदत व्हावी आणि सेवानिवृत्तीनंतर त्यास मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ म्हणून त्याला काही ठोक रक्कम देता यावी अशा दुहेरी लाभासाठी विम्याचे संरक्षण देता यावे हे या कमी खर्चाच्या आणि सर्वस्वी अंशदायी स्वरूपाच्या व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी अशा "योजनेचे" उद्दिष्ट आहे.

**लागू होणे**

३.१. ही "योजना" सर्व राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू होईल. कार्यव्ययी व औद्योगिक कर्मचारी हे जर नियमित राज्य शासकीय कर्मचारी असतील तर त्यांनाही ही योजना लागू होईल. ज्या राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ही योजना लागू आहे अशा राज्य शासकीय कर्मचाऱ्यांचा यापुढे "कर्मचारी" असा उल्लेख करण्यात आलेला आहे.

३.२. पुढील कर्मचाऱ्यांना ही "योजना" लागू होणार नाही.

(अ) कंत्राटी कर्मचारी.

(ब) केंद्र सरकार, इतर राज्य शासने, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम किंवा इतर स्वायत्त संस्था, निम-सरकारी संस्था यांच्याकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या व्यक्ती.

(क) अंशकालिक व तदर्थ कर्मचारी.

(ड) नैमित्तिक कामगार ते औद्योगिक कर्मचारी (स्थायी आदेश) अधिनियमाच्या कक्षेत येत असले तरी व औद्योगिक कामगार.

(ई) वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनाच्या सेवेत भरती झालेल्या व्यक्ती.

(फ) रजा मुदतीमध्ये नियुक्त केलेल्या व्यक्ती.

(ग) समुचित प्राधिकरणाद्वारे नियमित कार्यपद्धती अनुसरून रीतसर नियुक्ती केली जाईपर्यंत तात्पुरती (स्टॉप गॅप) व्यवस्था म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्ती.

(ह) वरील ३.१ मध्ये समाविष्ट न होणारे कार्यव्ययी कर्मचारी.

**सदस्यत्व**

४.१. १ मे १९८२ रोजी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांना ही योजना सक्तीने लागू करण्यात येईल. यात ५० वर्षे वय पूर्ण झालेल्या किंवा उलटलेल्या कर्मचाऱ्यांचाही समावेश होतो.

४.२. सदर योजना अधिसूचित करण्यात आल्यानंतर, राज्य शासनाच्या सेवेत दाखल होणाऱ्या सर्व "कर्मचाऱ्यांसाठी" ही योजना सक्तीची राहील. म्हणजे असे की, १ मे १९८२ नंतर राज्य शासनाच्या सेवेत दाखल होतील अशा सर्व कर्मचाऱ्यांना ही योजना अमलात येण्याच्या तारखेपासून "योजनेखाली" समाविष्ट करून घेण्यात येईल.

४.३. "योजना" अमलात आल्यानंतर, मे व्यतिरिक्त इतर महिन्यात सेवेत दाखल होणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना योजनेच्या पुढील वर्धापनदिनी "योजनेचे" सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात येईल.

**सदस्यांची वर्गणी**

५.१. "योजनेची" वर्गणी ही दरमहा रु. १० च्या युनिटांमध्ये असेल. चतुर्थ वर्गाचा कर्मचारी एक युनिट, तृतीय वर्गाचा कर्मचारी दोन युनिटे, द्वितीय वर्गाचा कर्मचारी चार युनिटे आणि प्रथम वर्गाचा कर्मचारी ८ युनिटे वर्गणी देईल. अशा प्रकारे "योजनेच्या" सदस्यांसाठी वर्गणीचा दर, वर्ग चार, वर्ग तीन, वर्ग दोन व वर्ग एक यांसाठी अनुक्रमे रु. १०, रु. २०, रु. ४० व रु. ८० असा असेल.

५.२. एखाद्या कर्मचाऱ्यास एका वर्गातून दुसऱ्या वर्गात नियमितपणे बढती मिळाल्यास, योजनेच्या पुढील वर्धापनदिनापासून त्याच्या "योजनेच्या" वर्गणीत, त्याला ज्या वर्गात बढती मिळाली असेल त्या वर्गाच्या समुचित पातळीप्रमाणे वाढ करण्यात येईल. अशी बढती मिळण्यापूर्वी विम्याचे संरक्षण म्हणून जेवढी रक्कम मिळण्यास तो पात्र असेल तेवढीच रक्कम मिळण्यास तो "योजनेच्या" पुढील वर्धापनदिनापर्यंत पात्र असेल.

उदाहरणार्थ, जर "योजना" १ मे १९८२ पासून अमलात आली तर, चतुर्थ वर्गातील एखाद्या कर्मचाऱ्यास जून १९८२ मध्ये नियमितपणे वर्ग ३ मध्ये बढती मिळाली असेल. तर एप्रिल १९८३ पर्यंत तो दरमहा रु. १० याच दराने वर्गणी देत राहील आणि तोपर्यंत तो फक्त रु. १०,००० इतक्याच रकमेचे विम्याचे संरक्षण आणि त्याच्या वर्गणीनुसार बचत निधीपासून मिळणारे लाभ मिळण्यास पात्र राहील. मे १९८३ पासून मात्र त्याची वर्गणी दरमहा रु. २० होईल आणि तो रु. २०,००० एवढ्या विम्याच्या संरक्षणास आणि बचत निधीपासून मिळणाऱ्या समुचित लाभास पात्र होईल.

**सदस्यांखेरीज इतर कर्मचाऱ्यांसाठी हप्ते व विम्याचे संरक्षण**

६.१. मे १९८२ नंतर येणाऱ्या मे महिन्याखेरीज दुसऱ्या एखाद्या महिन्यात सेवेत दाखल होणाऱ्या "कर्मचाऱ्यांना" ते शासकीय सेवेत दाखल झाल्याच्या तारखेपासून, "योजने" चे सदस्य होण्याच्या तारखेपर्यंत, विम्याच्या संरक्षणासाठी प्रत्येक रु. १०,००० एवढ्या विम्याच्या रकमेसाठी हप्ता म्हणून दरमहा रु. ३ याप्रमाणे वर्गणी दिल्यावर त्यांना विम्याच्या संरक्षणाचा समुचित लाभ देण्यात येईल. "योजनेच्या" वर्धापनदिनापासून वर परिच्छेद ५.१ मध्ये नमूद केलेल्या दराने ते वर्गणी देतील.

उदाहरणार्थ, "योजना" जर १ मे १९८२ पासून अमलात आली तर चतुर्थ वर्गातील जे कर्मचारी जून १९८२ मध्ये सेवेत दाखल होतील ते एप्रिल १९८३ पर्यंतच्या ११ महिन्यांच्या कालावधीसाठी रु. १०,००० एवढ्या विम्याच्या संरक्षणासाठी, हप्ता म्हणून दरमहा रु. ३ प्रमाणे वर्गणी देतील, आणि मे १९८३ पासून त्यांची वर्गणी दरमहा रु. १० पर्यंत वाढवण्यात

येईल आणि ते रु. १०,००० एवढ्या रकमेच्या विम्याच्या संरक्षणास आणि त्याशिवाय बचत निधीपासून मिळणारे लाभ मिळण्यासदेखील पात्र ठरतील. तसेच, जर एखादा तृतीय वर्गाचा कर्मचारी जून १९८२ मध्ये सेवेत दाखल झाला असेल तर तो एप्रिल १९८३ पर्यंतच्या ११ महिन्यांच्या कालावधीत रु. २०,००० एवढ्या विम्याच्या संरक्षणासाठी दरमहा रु. ६ याप्रमाणे वर्गणी देईल आणि मे १९८३ पासून त्याची वर्गणी दरमहा रु. २० पर्यंत वाढवण्यात येईल आणि रु. २०,००० एवढ्या तो विम्याच्या संरक्षणास आणि त्याशिवाय बचतनिधीपासून होणारे लाभ मिळण्यासदेखील पात्र ठरेल.

६.२. १९८२ या वर्षापासून सुरू करून प्रत्येक वर्षाच्या केवळ १ मे पासूनच कर्मचाऱ्यांना या नवीन "योजनेचे" सदस्य करून घेण्यात येईल. १९८२ या वर्षापासून सुरू करून कोणत्याही वर्षी २ मे रोजी किंवा त्यानंतर एखादा कर्मचारी सेवेत दाखल झाला तर त्याला तो सेवेवर प्रत्यक्षात रुजू झाल्याच्या तारखेपासून त्या वर्षाच्या अखेरीपर्यंत केवळ विम्याच्या संरक्षणाचा समुचित लाभच देण्यात येईल (परंतु योजनेखालील बचत निधीपासून मिळणारे लाभ त्याला देण्यात येणार नाहीत). ही व्यवस्था केवळ सेवेच्या पहिल्या वर्षासाठीच असेल आणि "योजने"च्या पुढील वर्धापन दिनापर्यंत ती चालू राहील. विम्याच्या संरक्षणाचे आणि बचत निधीचे असे संपूर्ण फायदे "योजनेच्या" पुढील वर्धापन दिनापासून उपलब्ध होणार असले तरी एखादी व्यक्ती सेवेत दाखल झाल्यानंतर लगेच तिला विम्याचे संरक्षण तातडतोब उपलब्ध व्हावे हा यामागचा हेतू आहे.

दरम्यानच्या काळात, परिच्छेद ६.१ मधील तरतुदीप्रमाणे विम्याच्या संरक्षणाच्या प्रत्येक रुपये १०,००० एवढ्या रकमेसाठी विम्याचा हप्ता म्हणून दरमहा रुपये ३ एवढी वर्गणी वसूल करण्यात येईल.

अशा रीतीने, चतुर्थ वर्गाचे कर्मचारी रुपये १०,००० या विम्याच्या संरक्षणासाठी दरमहा रुपये ३ चा विमा हप्ता देतील. तृतीय वर्गाचे कर्मचारी रुपये २०,००० या विम्याच्या संरक्षणासाठी दरमहा रुपये ६ चा विमा हप्ता देतील. द्वितीय वर्गाचे कर्मचारी रुपये ४०,००० या विम्याच्या संरक्षणासाठी दरमहा रुपये १२ चा विमा हप्ता देतील आणि प्रथम वर्गाचे कर्मचारी रुपये ८०,००० या विम्याच्या संरक्षणासाठी दरमहा रुपये २४ चा विमा हप्ता देतील. कर्मचारी ज्या वर्षी सेवेत दाखल झाला असेल त्या वर्षाच्या पुढील वर्षाच्या १ मे पासून वर्ग चार, तीन, दोन व एकच्या कर्मचाऱ्यांकडून दरमहा अनुक्रमे रुपये १०, रुपये २०, रुपये ४० व रुपये ८० ही संपूर्ण वर्गणी वसूल करण्यात येईल आणि ते या योजनेखालील बचत निधीपासून मिळणारे लाभ मिळण्यासदेखील पात्र ठरतील.

**सदस्यांसाठी विमा निधी व विम्याचे संरक्षण**

७.१. "योजने"च्या प्रत्येक सदस्यास विम्याचे संरक्षण देण्यासाठी वर्गणीचा काही भाग राज्य शासनाच्या लोकलेख्यात ठेवावयाच्या विमा निधीमध्ये जमा करण्यात येईल वर्गणीच्या प्रत्येक युनिटासाठी विम्याच्या संरक्षणाची रक्कम रुपये १०,००० असेल. राज्य शासनाच्या सेवेत असताना कोणत्याही कारणाने जे "कर्मचारी" दुर्दैवाने मृत्यू पावतील त्यांच्या कुटुंबाना ती रक्कम देण्यात येईल.

७.२. विमा निधीखालील धन किंवा ऋण, शिल्लक रक्कम, डाक-कार्यालय बचत बँकेच्या ठेवीवरील सध्याच्या व्याजाच्या दराने, व्याजाचा हिशेब करून त्या व्याजासह यथास्थिती जमा किंवा नावे टाकण्यात येईल. हा व्याजाचा दर सध्या दरसाल ५½ टक्के आहे.

**बचत निधी**

८.१. वर्गणीची शिल्लक रक्कम एका बचत निधीमध्ये जमा करण्यात येईल. बचत निधीमधील रक्कम राज्य शासनाकडून लोकलेख्यात ठेवण्यात येईल. बचतीची एकूण संचित रक्कम तिच्यावरील व्याजासह, सदस्यास तो नियत सेवा वयाचा झाल्यावर त्याच्या सेवा-निवृत्तिनंतर किंवा राज्य शासनाकडील त्याची सेवा संपुष्टात आल्यानंतर त्यास देण्यात येईल किंवा तो सेवेत असताना मरण पावल्यास त्याच्या कुटुंबास देण्यात येईल.

८.२. बचत निधीपासून मिळणारे लाभ हे यासोबत जोडलेल्या उदाहरणाच्या तक्त्यानुसार असतील. सोबत जोडलेल्या तक्त्यात दर्शवण्यात आलेल्या रकमा या सदस्यत्व संपुष्टात आल्याच्या महिन्याच्या अखेरीपर्यंतचे व्याज हिशेबात घेऊन जवळच्या रुपयापर्यंत काढण्यात आल्या आहेत आणि सदस्यत्व संपुष्टात येण्याच्या महिन्यासह कोणत्याही महिन्याची वर्गणी. त्या महिन्याच्या देण्यात आलेल्या किंवा त्या महिन्याच्या अखेरीस देण्यात यावयाच्या वेतनामधून कापून घेण्यात आली आहे किंवा कापून घेण्यात येईल असे गृहीत धरण्यात आले आहे. रुपये २०, रुपये ४० आणि रुपये ८० या मासिक वर्गणीच्या बचत निधीपासून मिळणारे लाभ हे रुपये १० या मासिक वर्गणीने जे लाभ मिळतात त्यांच्या अनुक्रमे दुप्पट, चौपट आणि आठपट असतील. हा लाभ केवळ उदाहरणरूप असून तो प्रत्यक्षात, दरहजारी ३.७५ या मृत्यूसंख्या प्रमाणाने विम्याचा खर्च वैयक्तिक वर्गणीतून कमी करून आणि त्यावर १० टक्के चक्रवाढ व्याज लावून त्या आधारावर रचना करण्यात आलेल्या आणि तक्त्यात दर्शवलेल्या रकमेपेक्षा थोडा कमी किंवा अधिक असू शकेल. कोणत्याही वेळी व्याजाचा दर आणि/किंवा विम्याचा खर्च बदलला तर बचत निधीपासून मिळणारे लाभसुद्धा त्याप्रमाणे बदलतील.

८.३. एखादा सदस्य मृत्यू पावेल त्याबाबतीत, बचत निधीमधील रकमेच्या प्रदानाव्यतिरिक्त विम्याची रक्कमही दिली जाईल.

८.४. बचत निधीतील धन शिल्लक रक्कम, शासनाच्या वित्त विभागाने त्या प्रयोजनासाठी अधिसूचित केलेल्या व्याजाच्या दराने मोजण्यात आलेल्या व्याजाच्या रकमेसह जमा करण्यात येईल.

८.५. योजना अमलात येण्याच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या ५ वर्षांच्या गटाकरित म्हणजेच १ मे १९८२ पासून ३० एप्रिल १९८७ पर्यंतच्या कालावधीकरिता बचत निधीमधील शिल्लक रकमांवर दरसाल १० टक्के दराने (तिमाहीने चक्रवाढ होणारे) व्याज देण्यात येईल.

**वर्गणीची वसुली**

९.१. एखाद्या सदस्याची एखाद्या महिन्याची वर्गणी ही त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस कामाच्या नेहमीच्या तासांच्या प्रारंभीच देय होईल.

९.२. शासकीय सेवेत दाखल झाल्याच्या तारखेपासून "योजने"च्या सदस्यत्वाच्या तारखेपर्यंत विम्याच्या संरक्षणाचा हप्ता म्हणून द्यावयाची वर्गणी ही सेवेत दाखल होण्याच्या तारखेपासून आणि त्यानंतर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या तारखेस कामाच्या नेहमीच्या तासाच्या प्रारंभापासून देय होईल.

९.३. एखाद्या महिन्याची वर्गणी ही त्या महिन्याचे वेतन/मजुरी प्रत्यक्षात कोणत्या तारखेस दिली जाते ते लक्षात न घेता कर्मचाऱ्याच्या त्या महिन्याच्या वेतनामधून/मजुरीमधन कापून वसूल करण्यात येईल.

९.४. सेवानिवृत्ति, मृत्यू, राजीनामा, सेवेतून काढून टाकणे इत्यादी कारणांमुळे एखादा कर्मचारी नोकरीत असण्याचे ज्या महिन्यात बंद झाले असेल त्या महिन्यासह प्रत्येक महिन्यात वर्गणी वसूल करण्यात येईल.

९.५. आहरण व संवितरण अधिकारी, "कर्मचारी" कामावर आहेत, रजेवर आहेत की निलंबित केले आहेत हे लक्षात न घेता त्यांच्याकडून वर्गणी वसूल करील.

९.६. वेतन/मजुरी उशीरा दिल्यामुळे वर्गणीची वसुली झाली नसेल तर वर्गणीच्या थकबाकीवर कोणतेही व्याज आकारण्यात येणार नाही.

९.७. जर एखादा "कर्मचारी" असाधारण रजेवर असेल आणि त्या कालावधीचे वेतन/मजुरी त्याला देण्यात येणार नसेल तर ज्या महिन्याचे वेतन/मजुरी त्यास देण्यात आलेली नसेल त्या महिन्याची त्याची वर्गणी, बचत निधीमधील जमा रकमेवर "योजने" नुसार अनुज्ञेय असलेल्या व्याजासह रजेनंतर ज्या महिन्यात तो कामावर रुजू होईल त्या महिन्यानंतरच्या महिन्याच्या त्याच्या वेतनापासून/मजुरीपासून सुरू करून तीनपेक्षा अधिक नाही इतक्या हप्त्यांमध्ये वसूल करण्यात येईल. असाधारण रजेवर असताना "कर्मचारी" मरण पावला तर त्याच्याकडून देय असलेली वर्गणी "योजनेनुसार" बचत निधीतील जमा रकमेवर अनुज्ञेय असलेल्या व्याजासह "योजने"नुसार त्याच्या कुटुंबास अनुज्ञेय असलेल्या प्रदानाच्या रकमांमधून वसूल करण्यात येईल. उदाहरणार्थ, जर एखादा चतुर्थ वर्गाचा कर्मचारी ५ जून १९८२ ते ४ एप्रिल १९८३ या दहा महिन्यांच्या कालावधीत असाधारण रजेवर असेल आणि जुलै १९८२ ते मार्च १९८३ पर्यंतच्या कोणत्याही दिवसाचे कोणतेही वेतन/मजुरी त्यास देण्यात आली नसेल तर त्याची एकूण रुपये ८० एवढी वर्गणीही दरसाल १० टक्के दरसाल चक्रवाढ व्याजाच्या दराने हिशेब करून येणाऱ्या व्याजासह. . . . . मे १९८३ पासून सुरू करून तीन पेक्षा अधिक नाहीत इतक्या हप्त्यांमध्ये वसूल करण्यात येईल.

९.८. जर एखादा "कर्मचारी" प्रतिनियुक्तीवर किंवा परकीय सेवेत गेला तर त्यास प्रतिनियुक्तीवर घेणाऱ्या प्राधिकरणास/परकीय मालकास, वर्गणी वसूल करण्याची आणि ती संबद्ध लेखाशीर्षामध्ये जमा करण्याची विनंती करण्यात येईल. भावी काळात प्रतिनियुक्तीच्या/परकीय सेवेच्या अटींमध्ये या आशयाचे आवश्यक ते कलम समाविष्ट करण्यात आले आहे याची खात्री करून घेण्यात येईल. रजा वेतन आणि निवृत्ती वेतन अंशदान यांच्या वसुलीवर ज्या पद्धतीने लक्ष ठेवले जाते त्याच पद्धतीने या रकमेच्या वसुलीवरही लक्ष ठेवण्यात येईल. कोणत्याही वेळी वर्गणीची वसुली थकबाकीत गेली तर ती थकबाकी बचत निधीतील जमा रकमेवर "योजने" नुसार अनुज्ञेय असलेल्या व्याजासह तीनपेक्षा अधिक नाही इतक्या हप्त्यांमध्ये वसूल करण्यात येईल.

**सर्वसाधारण/अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधन वर्गणीस पैसा पुरवणे**

१०.१. सर्वसाधारण/अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधून "योजनेस" पैसा पुरवण्यास सर्वसामान्यपणे परवानगी असणार नाही. तथापि, कोणत्याही एखाद्या वेळी एखाद्या सदस्याच्या परिस्थितीमुळे तो एकाचवेळी 'योजने' ची आणि सर्वसाधारण/अंशदायी भविष्यनिर्वाह

निधीची वर्गणी देऊ शकत नसला तर, एक स्वतंत्र व्यवहार म्हणून, "योजने" ला दिलेल्या एक वर्षाच्या वर्गणीएवढी ना परतावा उचलीची रक्कम सर्वसाधारण/अंशदायी भविष्यनिर्वाह निधीमधून काढण्याची त्याला परवानगी देता येईल.

१०.२. आयकराच्या प्रयोजनाकरिता वर्गणीदाराचे एकूण उत्पन्न लक्षात घेताना या योजनेची वर्गणी आयुर्विम्याचा हप्ता, भविष्यनिर्वाह निधीचे अंशदान, इत्यादीसाठी अनुज्ञेय वजातीचा एक भाग असेल मात्र, अशा वर्गणीकरिता सर्वसाधारण/अंशदायी भविष्यनिर्वाह निधीतून केलेली अंतिम उचल यास अपवाद असेल.

**विमा निधी/बचत निधीतून रकमेचे प्रदान**

११.१. जर एखादा कर्मचारी नियत वयमान पूर्ण झाल्यावर सेवानिवृत्त झाला किंवा अन्यथा तो राज्य शासनाच्या सेवेत राहिला नाही आणि त्याच्या सेवापुस्तकावरून तो "योजनेचा" सदस्य असल्याचे दिसून आले तर विभाग कार्यालय प्रमुख प्रपत्र क्रमांक ३ मध्ये एक साधा अर्ज घेऊन त्या सदस्याचे बचत निधीमध्ये संचित झालेले पैसे त्यास देण्यास मंजुरी देईल.

११.२. जर कर्मचाऱ्यास सेवेत असताना मृत्यू आला आणि त्याच्या सेवापुस्तकावरून तो "योजनेचा" सदस्य होता असे दिसून आले तर विभाग कार्यालय प्रमुख संबंधित सरकारी कर्मचाऱ्यांच्या नामनिर्देशित व्यक्तीला/वारसाला प्रपत्र क्रमांक ४ मध्ये प्रपत्र क्रमांक ५ मध्ये अर्ज सादर करण्याविषयी कळविल आणि असा अर्ज मिळाल्यावर विम्याची रक्कम आणि बचत निधीमध्ये संचित झालेली रक्कम तिला/त्याला देण्यास मंजुरी देईल.

११.३. ज्या "कर्मचाऱ्याच्या" नामनिर्देशित व्यक्तीला/वारसाला फक्त विम्याच्या संरक्षणाचाच लाभ मिळावयाचा असेल त्याला त्या "कर्मचाऱ्याच्या" वर्गात अनुज्ञेय असलेली विम्याची रक्कमच मिळेल.

११.४. या "योजनेच्या" ज्या सदस्यास सेवेत असताना मृत्यू येईल, त्याच्या नामनिर्देशित व्यक्तींना/वारसांना पुढील रक्कम देय होईल :—

(अ) कर्मचाऱ्याच्या मृत्यूसमयी त्यास विम्याची जी रक्कम मिळण्याचा हक्क असेल ती रक्कम, अधिक

(ब) त्याच्या सर्वात खालच्या वर्गातील सदस्यत्वाच्या संपूर्ण कालावधीसाठी बचत निधीतून त्याला देय होणारी रक्कम, आणि

(क) वरच्या वर्गात नियुक्ती केल्यामुळे/बढती दिल्यामुळे त्याच्या वर्गणीत प्रत्येक वेळी जेवढ्या रकमेने वाढ झाली असेल त्या जादा युनिटांमुळे त्याच्या वर्गणीत वाढ केल्याच्या तारखेपासून त्याच्या मृत्यूच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत त्याला देय होणारी रक्कम किंवा देय होणाऱ्या रकमा उदाहरणार्थ "योजनेचा" सदस्य असलेल्या एखाद्या चतुर्थ वर्गातील कर्मचाऱ्यास जर अनुक्रमे ५ आणि १५ वर्षांच्या सेवेनंतर अनुक्रमे वर्ग तीन व वर्ग दोन मधील सदस्यत्व मिळाले आणि या तिन्ही वर्गात मिळून एकूण ३० वर्षे सेवा झाल्यानंतर त्यास सेवेत असताना मृत्यू आला तर त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस किंवा व्यक्तींना खालीलप्रमाणे रकमा देण्यात येतील :—

(एक) मृत्यूच्या दिवशी तो कर्मचारी वर्ग दोन मधील कर्मचारी असल्यामुळे दरमहा रुपये ४० इतक्या मासिक वर्गणीमुळे देय होणारी विम्याची रक्कम रु. ४०,०००

(दोन) दरमहा रुपये १० याप्रमाणे ३० वर्षे वर्गणी भरून बचत निधीतून मिळावयाची रक्कम.

(तीन) दरमहा रुपये १० याप्रमाणे २५ वर्षे वर्गणी भरून (रुपये २०,—रुपये १०) बचत निधीतून मिळावयाची रक्कम, आणि

(चार) दरमहा रुपये २० (रुपये ४०,—रुपये २०) याप्रमाणे १५ वर्षे वर्गणी भरून बचत निधीतून मिळावयाची रक्कम.

११.५. राजिनामा, सेवानिवृत्ती इत्यादी कारणांमुळे जो कर्मचारी राज्य शासनाच्या सेवेत राहणार नाही त्यास खालीलप्रमाणे रक्कम देय होईल :—

(अ) त्याच्या सर्वात खालच्या वर्गातील सदस्यत्वाच्या संपूर्ण कालावधीसाठी बचत निधीतून त्यास देय होणारी रक्कम आणि

(ब) वरच्या वर्गात नियुक्ती केल्यामुळे बढती दिल्यामुळे त्याच्या वर्गणीत प्रत्येक वेळी जेवढ्या रकमेने वाढ झाली असेल त्या जादा युनिटांमुळे त्याच्या वर्गणीत अशा प्रकारे वाढ केल्याच्या तारखेपासून त्याचे सदस्यत्व संपुष्टात येण्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीत त्याला देय होणारी रक्कम किंवा देय होणाऱ्या रकमा. उदाहरणार्थ योजनेचा सदस्य असलेल्या एखाद्या चतुर्थ वर्गातील कर्मचाऱ्यास जर १० आणि २० वर्षांच्या सेवेनंतर अनुक्रमे वर्ग तीन व वर्ग दोन मधील सदस्यत्व मिळाले आणि या तिन्ही वर्ग मिळून एकूण ३० वर्षे सेवा केल्यानंतर तो सेवानिवृत्त झाला तर त्यास खालीलप्रमाणे रकमा देण्यात येतील :—

(एक) दरमहा रुपये १० याप्रमाणे ३० वर्षे वर्गणी भरून बचतीनिधीतून मिळावयाची रक्कम.

(दोन) दरमहा रुपये १० याप्रमाणे २० वर्षे वर्गणी भरून (रुपये २०,—रुपये १०) बचत निधीतून मिळावयाची रक्कम, आणि

(तीन) दरमहा रुपये २० याप्रमाणे १० वर्षे वर्गणी भरून (रुपये ४०,—रुपये २०) बचत निधीतून मिळावयाची रक्कम.

११.६. जर एखाद्या महिन्यात एखाद्या कर्मचाऱ्यास त्याच्याकडून त्या महिन्याची वर्गणी वसूल होण्यापूर्वीच मृत्यू आला तर त्याची देय रक्कम त्या महिन्याची त्याची वर्गणी कापून घेतल्यानंतर त्यास देण्यात येईल.

११.७. जर एखादा कर्मचारी मागाहून एखाद्या अखिल भारतीय सेवेत रुजू झाला तर भारत सरकारचे वित्त मंत्रालय ठरविल त्याप्रमाणे त्याचे प्रकरण विनियमित करण्यात येईल.

**विमा निधी/बचत निधी यांतून रकमा काढणे**

१२.१. योजनेच्या कोणत्याही सदस्यास किंवा इतर लाभाधिकाऱ्यास तो ज्या विमा निधीची वर्गणी भरत असेल त्या विमा निधीतून कोणतीही रक्कम काढण्याची परवानगी नाही. योजनेचा सदस्य सेवेत असताना मरण पावल्यास, त्याला निधीतून द्यावयाची रक्कम परिच्छेद ११ अन्वये हिशेब करून काढण्यात येईल आणि स्वतंत्रपणे विहित करण्यात येत असलेल्या लेखांकन पद्धतीनुसार त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीला/व्यक्तींना ती देण्यात येईल.

**विमा निधी/बचत निधी यातील संचित रकमेतून कर्जे/आगाऊ रकमा**

१३. "योजनेच्या" कोणत्याही सदस्यास किंवा इतर लाभाधिकाऱ्यास तो ज्या विमा निधीची/बचत निधीची वर्गणी देत असेल त्या निधीत त्याच्या नावे संचित झालेल्या रकमेतून कोणतीही कर्जे किंवा आगाऊ रकमा दिल्या जाणार नाहीत.

**विमा निधी/बचत निधी यातील संचित रकमेचा वापर**

१४. विमा निधी/बचत निधी यातील संचित रक्कम राज्य शासनाच्या अखत्यारीत राहिल. ही "योजना" पूर्णपणे आर्थिक दृष्टया स्वावलंबी व स्वयंनिर्वाही असल्यामुळे या संचीत रकमेतील बरीच मोठी रक्कम या योजनेच्या सदस्यांच्या हितार्थ मालकी हक्काच्या गृहनिर्माण योजनेसाठी व इतर योजनांसाठी वापरण्याचे योजिले आहे.

**"योजनेच्या" अधिसूचनेची पद्धत**

१५. योजनेची एक प्रत सूचना फलकावर लावून "योजना" सर्वांना अधिसूचित करण्यात यईल, जेथे अशा प्रकारच्या सूचनाफलकाची तरतूद नसेल त्या बाबतीत कर्मचारी जेथे काम करीत असतील अशा आवारात एखाद्या ठळक ठिकाणी लावून ती अधिसूचित करण्यात येईल.

**"योजनेच्या" अधिसूचनेनंतरची कार्यवाही**

१६. "योजना" ज्या महिन्यात अधिसूचित करण्यात येईल त्या महिन्याच्या पुढील प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत विभाग/कार्यालय प्रमुख आहरण व संवितरण अधिकाऱ्यास आणि संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना अगोदरच्या महिन्यात राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही सेवेत किंवा पदावर ज्यांची नेमणूक करण्यात आली असेल व "योजनेच्या" परिच्छेद ३ अन्वये ज्या "योजनेच्या" सदस्य बनण्यास पात्र असतील अशा व्यक्तींची नावे, वर्ग, जन्माचे दिनांक व नियुक्तिचे दिनांक कळवील.

**योजना अंमलात आल्यानंतरची कार्यवाही**

१७.१. "योजना" ज्या महिन्यात अंमलात येईल त्या महिन्याच्या १० तारखेपर्यंत विभाग/कार्यालय प्रमुख आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आणि संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना एक विवरणपत्र पाठविल, "योजना" अधिसूचित होण्याच्या तारखेस राज्य शासनाच्या सेवेत असलेल्या प्रत्येक "कर्मचाऱ्याचे" नाव, वर्ग आणि जन्माचा दिनांक त्या विवरण पत्रात तो नमूद करील.

१७.२. "योजनेच्या" प्रत्येक सदस्याला प्रपत्र क्र. १ मध्ये त्याला सदस्य म्हणून दाखल करून घेतल्याचा दिनांक, कापावयाची त्याची वर्गणी आणि जे लाभ मिळण्यास तो पात्र असेल असे लाभ कळवण्यात येतील. त्याला एका वर्गातून दुसऱ्या वर्गात नियमितपणे बढती मिळाली असेल अशा वेळी त्याला तशीच माहिती प्रपत्र क्र. २ मधून कळवण्यात येईल.

**सदस्यांची नोंदवही**

१८. प्रपत्र क्र. ८ मध्ये सदस्यांची वर्गनिहाय नोंदवही ठेवण्यात येत असून ती अद्ययावत ठेवली जाते याबद्दल विभाग/कार्यालय प्रमुख खात्री करून घेईल. "योजनेखालील" विमा निधी व बचत निधीसाठी सर्व कर्मचाऱ्यांकडून समुचित वर्गणी वसूल केली जाते हे पडताळून पाहण्यासाठी व त्या आशयाच्या प्रमाणपत्राची नोंद करण्यासाठी ही नोंदवही वर्षातून एकदा संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्याकडे पाठवण्यात येईल.

**नामनिर्देशनपत्र**

१९.१. "योजनेचा" सदस्य असलेल्या प्रत्येक शासकीय कर्मचाऱ्याकडून विभाग|कार्यालय प्रमुख एक नामनिर्देशनपत्र घेईल त्यामध्ये त्या कर्मचाऱ्याने, नियत्तसेवा वयमान होण्यापूर्वीच तो मरण पावल्यास त्यास या योजनेखाली जी रक्कम देय होईल ती स्वीकारण्याचा अधिकार एका किंवा अनेक व्यक्तिना बहाल केलेला असेल. योजना अधिसूचित होण्याच्या दिनांकानंतर राज्य शासनाच्या सेवेत रुजू होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशी नामनिर्देशनपत्रे त्यांच्या रुजू होण्याच्या प्रतिवेदनासोबतच घेण्यात येतील.

१९.२. जर "योजनेचा" एखादा सदस्य अज्ञान असेल तर सज्ञानतेचे वय झाल्यानंतर त्याला नामनिर्देशनपत्र लिहून द्यावे लागेल.

१९.३. नामनिर्देशनपत्र करून देतेवेळी "योजनेचा" सदस्य कुटुंबवान असेल तर त्याने असे नामनिर्देशनपत्र फक्त आपल्या कुटुंबातील एका किंवा अधिक व्यक्तींच्या नावानेच केले पाहिजे. या प्रयोजनासाठी कुटुंब या संज्ञेला सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधी नियमांमध्ये जो अर्थ दिलेला आहे तोच त्या संज्ञेचा अर्थ राहील.

१९.४. परिच्छेद १९.१ खाली जर एखाद्या सदस्याने एकापेक्षा अधिक व्यक्तिना नामनिर्देशित केले असेल तर त्याने आपल्या नामनिर्देशनपत्रात नामनिर्देशित व्यक्तींपैकी प्रत्येकास देय रकमेचा किती हिस्सा द्यावयाचा त्याचा निर्देश अशारीतीने केला पाहिजे की, "योजनेखाली" देय होणारी संपूर्ण रक्कम त्यात समाविष्ट होईल, असे न केल्यास, योजनेखाली देय होणारी रक्कम नामनिर्देशित व्यक्तींमध्ये समसमान वितरित केली जाईल.

१९.५. नामनिर्देशनपत्र हे परिस्थितीनुसार उचित असेल त्याप्रमाणे प्रपत्र क्र. ६ किंवा प्रपत्र क्र. ७ मध्ये देण्यात येईल.

१९.६. विभाग|कार्यालय प्रमुखाला एक नोटीस आणि वरील तरतुदीनुसार केलेले नवीन नामनिर्देशनपत्र पाठवून "योजनेच्या" सदस्याली कोणत्याही वेळी नामनिर्देशनपत्र रद्द करता येईल.

१९.७. सदस्याकडून आलेल्या नामनिर्देशनपत्रावर विभाग|कार्यालय प्रमुख प्रतिस्वाक्षरी करील आणि ते सदस्याच्या सेवापुस्तकात चिकटवून ठेवीली. तसेच विभाग|कार्यालय प्रमुख सेवापुस्तकात नामनिर्देशनपत्र रीतसर मिळाले असल्याचीही एक नोंद करून ठेवील.

**लेखांकन**

२०. "योजनेशी" संबंधित व्यवहारांचे लेखांकन स्वतंत्रपणे विहित करण्यात येत असलेल्या लेखांकन कार्यपद्धतीनुसार करण्यात येईल.

**अर्थ उकल व स्पष्टीकरण**

२१.१. जर कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही प्रवर्गांना वर्ग एक, वर्ग दोन, वर्ग तीन किंवा वर्ग चार असे विवक्षित वर्ग दिलेले नसतील तर त्यांची वर्गवारी शासनाकडे निर्देश केल्यावर ठरवण्यात येईल.

२१.२. " योजना " प्रत्यक्षात कार्यान्वित करताना जर या " योजनेच्या " कोणत्याही तरतुदीच्या अर्थ उकलीबाबत कोणतीही शंका उद्भवली किंवा एखाद्या मुद्यावर स्पष्टीकरणाची गरज भासली तर ती बाब वित्त विभागाकडे निर्देशित करता येईल. त्यासंबंधातील वित्त विभागाचा निर्णय अंतिम असेल.

**" योजनेचा " आढावा**

२२. " योजना " आर्थिकदृष्टया स्वावलंबी आणि स्वयंनिर्वाही राहील याची खात्री करून घेण्यासाठी दर तीन वर्षांनी योजनेच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येईल.

## तक्ता 'अ' (परिच्छेद ४.२)

**दरमहा रुपये १० वर्गणीने १ मे १९८२ ते ३० एप्रिल १९८७ या कालावधीत राज्य सरकारी कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खाली बचत निधीमधून मिळणारे लाभ**

(रुपयांमध्ये)

दाखल होण्याचा दिनांक

१९८२-८३ या पहिल्याच वर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास--

सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना

| दाखल होण्याचा दिनांक | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ मे १९८२ .. | ७ | १४ | २१ | २८ | ३५ | ४२ | ४९ | ५७ | ६४ | ७१ | ७९ | ८६ |

१९८३-८४ या दुसऱ्या वर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास---

सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना

| दाखल होण्याचा दिनांक | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ मे १९८२ .. | ९४ | १०१ | १०९ | ११७ | १२५ | १३२ | १४० | १४८ | १५७ | १६५ | १७३ | १८१ |
| १ मे १९८३ .. | ७ | १४ | २१ | २८ | ३५ | ४२ | ४९ | ५७ | ६४ | ७१ | ७९ | ८६ |

१९८४-८५ या तिसऱ्या वर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास -

सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना

| दाखल होण्याचा दिनांक | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ मे १९८२ .. | १८९ | १९८ | २०६ | २१५ | २२४ | २३२ | २४१ | २५० | २५९ | २६८ | २७७ | २८६ |
| १ मे १९८३ .. | ९४ | १०१ | १०९ | ११७ | १२५ | १३२ | १४० | १४८ | १५७ | १६५ | १७३ | १८१ |
| १ मे १९८४ .. | ७ | १४ | २१ | २८ | ३५ | ४२ | ४९ | ५७ | ६४ | ७१ | ७९ | ८६ |

**तक्ता 'अ'—चालू**

१९८५–८६ या चौथ्या वर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास--

| दाखल होण्याचा दिनांक | सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | ज।नेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
| १ मे १९८२ .. | २९५ | ३०५ | ३१४ | ३२३ | ३३३ | ३४३ | ३५२ | ३६२ | ३७२ | ३८२ | ३९२ | ४०२ |
| १ मे १९८३ .. | १८९ | १९८ | २०६ | २१५ | २२४ | २३२ | २४१ | २५० | २५९ | २६८ | २७७ | २८६ |
| १ मे १९८४ .. | ९४ | १०१ | १०९ | ११७ | १२५ | १३२ | १४० | १४८ | १५७ | १६५ | १७३ | १८१ |
| १ मे १९८५ .. | ७ | १४ | २१ | २८ | ३५ | ४२ | ४९ | ५७ | ६४ | ७१ | ७९ | ८६ |

१९८६–८७ या पाचव्या वर्षी सदस्यत्व संपुष्टात आल्यास—

| दाखल होण्याचा दिनांक | सदस्यत्व संपुष्टात येण्याचा महिना | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल |
| १ मे १९८२ .. | ४१२ | ४२२ | ४३३ | ४४३ | ४५४ | ४६४ | ४७५ | ४८६ | ४९७ | ५०८ | ५१९ | ५३० |
| १ मे १९८३ .. | २९५ | ३०५ | ३१४ | ३२३ | ३३३ | ३४३ | ३५२ | ३६२ | ३७२ | ३८२ | ३९२ | ४०२ |
| १ मे १९८४ .. | १८९ | १९८ | २०६ | २१५ | २२४ | २३२ | २४१ | २५० | २५९ | २६८ | २७७ | २८६ |
| १ मे १९८५ .. | ९४ | १०१ | १०९ | ११७ | १२५ | १३२ | १४० | १४८ | १५७ | १६५ | १७३ | १८१ |
| १ मे १९८६ .. | ७ | १४ | २१ | २८ | ३५ | ४२ | ४९ | ५७ | ६४ | ७१ | ७९ | ८६ |

टीप.—सदस्यत्व संपुष्टात येण्याच्या महिन्यापर्यंतची संपूर्ण वर्गणी भरण्यात आली आहे. त्या महिन्याच्या वेतनातून ती वसूल करण्यात येईल असे गृहीत धरण्यात आले आहे, तसे न झाल्यास सदर वर्गणीची रक्कम वर दिलेल्या संचित रकमेतून कापून [illegible].

तक्ता 'ब'

(परिच्छेद ८.२)

**राज्य सरकारी कर्मचारी गट विमा योजना, १९८२ व्याजाचा दर दरसाल १० टक्के असल्यास बचत निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमा**

| जितकी वर्षे वर्गणी भरली ती वर्षे (संख्या) | निव्वळ वार्षिक बचत रु. ८२.५० (दरमहा रु. १० याप्रमाणे वर्गणी भरल्यानंतर होणारी) | निव्वळ वार्षिक बचत रु. १६५ (दरमहा रु. २० याप्रमाणे वर्गणी भरल्यानंतर होणारी) | निव्वळ वार्षिक बचत रु. ३३० (दरमहा रु. ४० याप्रमाणे वर्गणी भरल्यानंतर होणारी) | निव्वळ वार्षिक बचत रु. ६६० (दरमहा रु. ८० याप्रमाणे वर्गणी भरल्यानंतर होणारी) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| ५ | ५२८ | १,०५६ | २,११२ | ४,२२४ |
| १० | १,३०० | २,७६० | ५,५२० | ११,०४० |
| १५ | २,७५० | ५,५०० | ११,००० | २२,००० |
| २० | ४,९५८ | ९,९१६ | १९,८३२ | ३९,६६४ |
| २५ | ८,५१३ | १७,०२६ | ३४,०५२ | ६८,१०४ |
| ३० | १४,२३९ | २८,४७८ | ५६,९५६ | १,१३,९१२ |
| ३५ | २३,४६० | ४६,९२० | ९३,०४० | १,८७,६८० |
| ४० | ३८,३११ | ७६,६२२ | १,५३,२४४ | ३,०६,४८८ |

**प्रपत्र क्रमांक १**

(परिच्छेद १७.२)

क्रमांक :

महाराष्ट्र शासन,
....... विभाग/कार्यालय,
दिनांक

**ज्ञापन**

................................ वर्गातील शासकीय कर्मचारी श्री.* ........................................ यांना ............................ पासून राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ चे सदस्य म्हणून दाखल करून घेण्यात आले आहे. .......... महिन्यापासून त्यांच्या वेतनातून/मजुरीतून दरमहा रु. .... (रुपये ..........................) एवढी मासिक वर्गणी कापून घेण्यात येईल आणि .......................... पासून ते या योजनेचे ...................... वर्गास मिळू शकणारे लाभ मिळण्यास पात्र असतील.

(विभाग/कार्यालय प्रमुख)

श्री. * ..............................

..............................

.............................. यांस

*कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम.

**प्रपत्र क्रमांक २**

(परिच्छेद १७.२)

क्रमांक :

महाराष्ट्र शासन,
········· विभाग/कार्यालय

दिनांक :

**ज्ञापन**

श्री. * ··················································· यांना ······························ पासून ···················· वर्गातून ······························ वर्गात नियमितपणे बढती देण्यात आली आहे. त्यांच्या राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ च्या रु. ·················· या मासिक वर्गणीत रु. ···························· पर्यंत वाढ ················ महिन्यापासून करण्यात आली आहे आणि ······················ पासून ते या योजनेचे ······························ वर्गास मिळू शकणारे लाभ मिळण्यास पात्र असतील.

(विभाग/कार्यालय प्रमुख)

श्री. * ································
································
································ यांस

(* कर्मचाऱ्याचे नाव व पदनाम)

**प्रपत्र क्रमांक ३**

(परिच्छेद ११.१)

*.............................

............................... यांस

**विषय.**—राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खालील संचित रक्कम मिळण्याचा अर्ज.

महोदय,

मी † ........................................ पासून राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ चा सदस्य आहे. मी ...................... .................... पासून .................... वर्षे वय झाल्यामुळे सेवा-निवृत्त झालो आहे/ राज्य शासनाच्या सेवेत नाही. सेवानिवृत्तीपूर्वी/ राज्य शासनाची सेवा सोडण्यापूर्वी मी ........................................ हे पद धारण केले होते. राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजनेखाली मला मिळू शकणारी रक्कम मला देण्यात यावी अशी मी विनंती करतो/ते.

आपला,

(                    )

* विभाग/कार्यालय प्रमुखाचे पदनाम व पत्ता

† योजनेचा सदस्य होण्याचा महिना व वर्ष येथे लिहावे.

**प्रपत्र क्रमांक ४**

(परिच्छेद ११.२)

**क्रमांक :**

महाराष्ट्र शासन,

.......... विभाग/कार्यालय

दिनांक :

*...............................

...............................यांस,

**विषय.**—राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खालील देय रकमेचे प्रदान.

**महोदय/महोदया,**

मला आपणाला असे कळविण्याचा निदेश झाला आहे की, कै./पै./स्त्रि. श्री. .............. ............................यांनी राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खाली त्यांना देय असलेली संपूर्ण/..........................टक्के रक्कम मिळण्यास आपणाला नामनिर्देशित केले आहे. या प्रदानाची व्यवस्था करण्यासाठी आपण यासोबत जोडलेल्या प्रपत्र क्र. ५ मध्ये अर्ज सादर करावा अशी आपणांस विनंती करण्यात येत आहे.

आपला,

(                    )

*नामनिर्देशित व्यक्तीचे नाव व पत्ता.

**प्रपत्र क्रमांक ५**

(परिच्छेद ११.२)

..................................

.................................. यांस,

विषय.—कै./पै./खि. श्री. ...........................................
यांना राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खाली देय असलेली रक्कम मिळण्याबाबत अर्ज.

महोदय,

आपले पत्र क्रमांक .................... दिनांक .................... ,
च्या संदर्भात मी आपणास याद्वारे विनंती करते/करतो की, राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजनेखाली कै./पै./खि. श्री. ........................................ यांना देय असलेली संपूर्ण/ .......................... टक्के रक्कम मला देण्यात यावी.

आपला,

(            )

*प्रपत्र ४ ज्या विभागाकडून/कार्यालयाकडून आले असेल त्या विभागाचे/कार्यालयाचे नाव व पत्ता

-४८-

**प्रपत्र क्रमांक ६**

**(परिच्छेद १९.५)**

**राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खालील लाभांसाठी नामनिर्देशन**

**शासकीय कर्मचाऱ्यांचे कुटुंब नसेल व तो/ती एका किंवा अनेक व्यक्तींस नामनिर्देशित करू इच्छित असेल अशा वेळी.**

माझे कुटुंब नसल्यामुळे मी याद्वारे खाली नाव नमूद केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना नामनिर्देशित करीत असून तिला/त्यांना सेवेत असताना मी मरण पावलो तर, राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खाली राज्य शासन मंजूर करील अशी कोणतीही रक्कम किंवा माझे नियत सेवा वयमान झाल्यानंतर जी देय झाली असेल व माझ्या मृत्यूच्या वेळी मिळावयाची राहिली असेल अशी कोणतीही रक्कम खाली नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत स्वीकारण्याचा अधिकार बहाल करीत आहे.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे आणि पत्ता/पत्ते | शासकीय कर्मचाऱ्याशी असलेले नाते | वय | प्रत्येकाला प्रदान करावयाचा रकमेचा हिस्सा * | जी घटना घडल्यास नामनिर्देशन अग्राह्य होईल अशी घटना † | नामनिर्देशित व्यक्ती शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यूपूर्वीच मरण पावल्यास तिचा अधिकार ज्या व्यक्तीकडे जाईल अशा व्यक्तीचे नाव, पत्ता आणि शासकीय कर्मचाऱ्याशी नाते असल्यास ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

आज .................. रोजी .............. येथे

सहीचे दोन साक्षीदार :—

१.

२.

शासकीय कर्मचाऱ्याची सही.

टीप.- - शासकीय कर्मचाऱ्याने सही केल्यानंतर नामनिर्देशन पत्रात आणखी कोणतीही नावे समाविष्ट करण्यास प्रतिबंध करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याने शेवटच्या नोंदीखालील कोऱ्या जागेत आरपार रेघ मारावी.

*विमा योजनेखाली देय होणारी संपूर्ण रक्कम समाविष्ट होईल अशा रीतीने हा स्तंभ भरावा.

†कुटुंब नसणारा शासकीय कर्मचारी नामनिर्देशन करीत असेल तेव्हा त्याने या स्तंभात असे स्पष्ट करावे की, पुढे केव्हातरी तो कुटुंबवान झाला, तर हे नामनिर्देशन अग्राह्य होईल.

**प्रपत्र क्रमांक ७**

**(परिच्छेद १९.५)**

**राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खालील लाभांसाठी नामनिर्देशन**

शासकीय कर्मचारी कुटुंबवान असेल व तो/ती कुटुंबातील एका किंवा अनेक व्यक्तींस नामनिर्देशित करू इच्छित असेल अशावेळी.

मी याद्वारे माझ्या कुटुंबाचा घटक असलेल्या खाली नाव नमूद केलेल्या व्यक्तीस/व्यक्तींना नामनिर्देशित करीत असून तिला/त्यांना सेवेत असताना मी मरण पावलो/लि तर, राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२ खाली राज्य शासन मंजूर करील अशी कोणतीही रक्कम किंवा माझे नियतसेवा वयमान झाल्यानंतर जी देय झाली असेल व माझ्या मृत्यूच्या वेळी मिळावयाची राहिली असेल अशी कोणतीही रक्कम खाली नमूद केलेल्या मर्यादेपर्यंत स्वीकारण्याचा अधिकार बहाल करीत आहे.

| नामनिर्देशित व्यक्तीचे/व्यक्तींची नाव/नावे आणि पत्ता/पत्ते | शासकीय कर्मचाऱ्याशी असलेले नाते | वय | प्रत्येकाला प्रदान करावयाचा रकमेचा हिस्सा * | जी घटना घडल्यास नामनिर्देशन अग्राह्य होईल अशी घटना | नामनिर्देशित व्यक्ती शासकीय कर्मचाऱ्याच्या मृत्यू पूर्वीच मरण पावल्यास तिचा अधिकार ज्या व्यक्तीकडे जाईल अशा व्यक्तीचे नाव, पत्ता आणि शासकीय कर्मचाऱ्याशी नाते असल्यास ते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | | | | | |
| २. | | | | | |
| ३. | | | | | |

आज दिनांक ............ रोजी .............. येथे

दोन साक्षीदारांच्या सह्या :

१.

२.

शासकीय कर्मचाऱ्याची सही.

टीप.—शासकीय कर्मचाऱ्याने सही केल्यानंतर नामनिर्देशन पत्रात आणखी कोणतीही नावे समाविष्ट करण्यास प्रतिबंध करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्याने शेवटच्या नोंदीखालील कोऱ्या जागेत आरपार रेघ मारावी.

*विमा योजनेखाली देय होणारी संपूर्ण रक्कम समाविष्ट होईल अशा रीतीने हा स्तंभ भरावा.

**प्रपत्र क्रमांक ८**

राज्य शासकीय कर्मचारी गट विमा योजना, १९८२

सदस्यांची नोंदवही

(परिच्छेद १८)

विमा निधीस व बचत निधीस वर्गणी भरणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तपशील

| अनुक्रमांक | नाव | पदनाम | जन्म दिनांक | नियुक्तीचा दिनांक | वर्गणी भरण्यास सुरुवात केल्याचा दिनांक | वरच्या वर्गात बढती झाल्याचा/ दुसऱ्या विभागात बदली झाल्याचा दिनांक | सदस्यत्व संपुष्टात येण्याचा दिनांक व त्याचे कारण | मृत्यूचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |